माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.२११३३८/२१/अ.क्र.५८३०/२४/०१

**श्री.मुकेश ज. धारोड**
५८/५९, जवेरी विला, १ ला मजला, रुम नं.८,
डी.बी.मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) डी विभाग,**
डी विभाग मनपा कार्यालय इमारत, जोबनपुत्र आवार, नाना चौक,
ग्रँट रोड (प.), मुंबई-४०० ००७.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. व का.) डी विभाग,**
३ रा मजला, डी विभाग मनपा कार्यालय इमारत, जोबनपुत्र आवार,
नाना चौक, ग्रँट रोड (प.), मुंबई-४०० ००७.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.१२.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित, ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०६.१२.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.११.२०२० | २८.११.२०२० | ०९.१२.२०२० | २४.१२.२०२० |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि.२८.११.२०२० रोजीचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि. २४.१२.२०२० रोजीचे आदेश संलग्न करुन दि.२४.०३.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. ०२.११.२०२० अन्वये "Action taken or progress report on my letter dated 19.08.2020 बाबत माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी दि.२८.११.२०२० रोजी च्या पत्रान्वये "अपीलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. ~~येत आहे", असे उत्तर दिले~~ आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेलया माहितीबाबत समाधान न झाल्यामुळे प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता डी विभाग यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले की, अपीलार्थी यांना उचित व विहीत कालावधीत उत्तर दिलेले आहे. परंतु अपीलार्थी यांना उत्तरासोबत जोडलेली माहिती मिळाली नसल्याने सदरहू माहिती त्यांना देण्यात यावी", असे आदेश पारित केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. २४.०३.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) डी विभाग, श्री. विलास येले व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता डी विभाग, दिलीप आहिरे उपस्थित आहेत.

अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) डी विभाग यांनी अपीलार्थी यांना उत्तर दिले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) डी विभाग यांनी अपीलार्थी यांना माहिती दिली आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
26-12-2024

**मुंबई**
**दिनांक :२६.१२.२०२४**

State Information Commission
Maharashtra

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**